# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. २४/०५/२००७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरूवार दिनांक २४/०५/२००७ रोजी सभा सुचना क्र. ५ दि. १८/०५/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ५) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ६) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ७) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ८) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ९) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| १०) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| ११) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १२) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| २) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ३) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ४) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |

**मा. सभापती साो. :-**

या सभेला उपस्थित असलेल्या सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग व मनपा कर्मचारी वर्ग यांचे मी हार्दिक स्वागत करतो. आणि सचिवांना सभेला सुरुवात करावी अशी मी नगरसचिंवाना सुचना करतो.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३४ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

इतिवृत्तांच्या नं. ४ मध्ये माझे संभाषण आहे की बरोबर आहे. मी आपल्याशी सहमत आहे. परिपत्रक ठेवायचे आहे.' तर ते ठेवायचे आहे ना. तर तेथे ठेवायला पाहिजे असे दुरुस्त करा.

(सन्मा. सदस्य जेन्वी अल्मेडा यांनी प्रकरण क्र. ३४ च्या ठरावाचे वाचन केले.)

**परशुराम म्हात्रे :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ३४ :-**

दि. ०३/०१/२००७ व दि. ०६/०१/२००७ (दि. ०३/०१/२००७ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ३२ :-**

दि. ०३/०१/२००७ व दि. ०६/०१/२००७ (दि. ०३/०१/२००७ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्रीम. जेन्वी आल्मेडा    अनुमोदक :- श्री. परशुराम म्हात्रे

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३५ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

सदरचा जो विषय आला आहे. आपण लिहिलेल्या गोषवाऱ्याप्रमाणे, ह्यांचा ठराव आलेला आहे. बालवाडी विद्यार्थ्यांना मोड आलेले कडधान्य, मसाले मध्ये तयार केलेले, शेंगदाणे, गूळ, फुटाणे, अंडी, बिस्किटे नाचणीयुक्त आणि सोयाबीनयुक्त बिस्किटे, केळी इत्यादी. तुम्ही ह्यामध्ये बालवाडी विद्यार्थ्यांना नक्की कोणते पदार्थ देतात? माझ्यामते, फक्त केळीच जास्त पुरवली जातात. ही जेवढे पदार्थ दिले आहे. त्या पदार्थामध्ये प्रत्येकी दिवसात देतात की एकच पदार्थ पुरवला जातो. ह्याचा प्रशासनाने खुलासा करावा.

**आर.डी.असोदेकर (समाजविकास अधिकारी) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलत आहे, ह्यामध्ये प्रत्येक दिवसाच्या अल्टरनेटमध्ये सात दिवसापैकी फक्त एक दिवस सोडून आम्ही सहा दिवस अल्टरनेट देत असतो. आणि त्यामध्ये गुजराती लोकांना जरा अंडयांचा प्रॉब्लेम होतो. त्यामुळे आम्ही केळी जास्त देतो.

**शशिकांत भोईर :-**

माझ्या माहितीप्रमाणे, जास्तीत जास्त केळीच वाटप केली जातात.

**आर.डी.असोदेकर (समाजविकास अधिकारी) :-**

त्याच्यामुळेच आहे ना. गुजराती विद्यार्थी जास्त असल्यामुळे ते अंडी घेत नाहीत.

**शशिकांत भोईर :-**

गुजराती समाजाचे विद्यार्थी असू देत किंवा मराठीचे असू देत. पण जास्तीत जास्त केळीच वाटप करतात. दुसरे, नाचणीयुक्त बिस्किटे असे तुम्ही म्हणता. हे कधी दिले नाही. शेंगदाणे, गूळसुद्धा दिले जात नाही.

**आर.डी.असोदेकर (समाजविकास अधिकारी) :-**

शेंगदाणे, गूळ दिला जातो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, गुजराती मिडियमचे किती शाळा आहेत?

**आर.डी.असोदेकर (समाजविकास अधिकारी) :-**

गुजराती मिडीयमच्या ३ शाळा आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आणि मराठी मिडीयमच्या किती शाळा आहेत?

**आर.डी.असोदेकर (समाजविकास अधिकारी) :-**

मराठी मिडीयमच्या १३ शाळा आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग, तुम्ही विचार करा की, १३ शाळा कुठे आणि तीन शाळा कुठे? म्हणजे याचा अर्थ असा आहे की तुम्ही जी माहिती दिली आहे. ती चुकीची दिलेली आहे. संपूर्ण शाळेमध्ये केळीच सप्लाय होते. तुमचे जे पदार्थ सांगितले आहे. त्यापैकी कुठलेही आयटम सप्लाय होत नाही. एक्सेप्ट केळी शिवाय कुठलेही आयटम सप्लाय होत नाही.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही मोड आलेले धान्यसुद्धा मसालेयुक्त करुन घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

शेंगदाणे, गूळ, फूटाणे ह्या गोष्टी डे आफ्टर डे द्यायचे असे ठरवा.

**शशिकांत भोईर :-**

आपले दिशाभूल करण्यासाठी हे सर्व पदार्थ दाखवले आहे. आणखी पदार्थ सुद्धा दिले असते. केळी पुरवठा ही स्वस्त आहेत. म्हणून जास्तीत जास्त केळीच दिले असते.

**आर.डी.असोदेकर (समाजविकास अधिकारी) :-**

अल्टरनेट तसे दिलेले आहे. आणि विशेष म्हणजे...

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, असे आहे की आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मागितलेली आहे. कोणाचा विरोध नाही. परंतु, ज्यावेळी तुमचे हे टेंडर येईल. ज्यावेळी मंजूरीला येईल. त्यावेळी तुम्ही संपूर्ण डिटेल अहवाल द्या की, तुम्ही अजूनपर्यंत किती मोउ आलेले धान्य कुठल्यादिवशी दिले? त्याचा टोटल अहवाल आम्हाला द्यावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

सन्मा. सदस्यांनी जी सुचना केली आहे ती उपयुक्त आहे. जरी ह्यापूर्वी फक्त केळीच दिली असे आपले जे ऑब्जेक्शन आहे. त्याबाबतीत नोंद घेउन ह्या आर्थिक वर्षांमध्ये प्रत्येक दिवसाला आपल्याला जो मटेरियल द्यायचा आहे. तुम्ही एक दिवस कडधान्याचे फिक्स करा. एक दिवस शेंगदाणे, गूळ फिक्स करा. एक दिवस फुटाणे फिक्स करा आणि एक दिवस बिस्किट आणि एक दिवस केळी असे शेडयूल तयार करा. आणि त्या प्रकारचेच निविदा मागवा. अंडी नको, काही लोक अंडी खात नाहीत. जे अंडी खातात त्यांना एक दिवस अंडी द्या. त्या दिवशी अंडयाला कोणताही एक पदार्थ सबट्यूड ठेवा. म्हणजे कॉन्ट्रक्टरला एकच पदार्थ न देता त्या आठवडयाच्या शेडयूलमध्ये जे पदार्थ आवश्यक आहेत. त्याप्रमाणे त्याने पुरवठा करावा. आपली सुचना विचारात घेउन...

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, एक आणखी सुचना देतो. असे करा की, सोमवारी हा पदार्थ, बुधवारी हा पदार्थ, गुरुवारी हा पदार्थ अशाप्रकारे तुम्ही शेडयूल तयार करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आणि अंडयाला सबटिटयूड ह्यापैकी एक पदार्थ ठेवू. अशा निविदा मागवण्यात येतील. आणि त्याप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

**जेन्वी अल्मेडा :-**

साहेब, माझ्या माहितीनुसार आपण हे जसे टाईमटेबल केलेले आहे. तसेच टाईमटेबल केलेले आहे. पण, त्यानुसार ते पदार्थ दिले जात नाही नेहमी केळी आणि बिस्किटांचीच पुडे दिले जातात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आपण तसे आता होउ देणर नाही.

**जेन्वी अल्मेडा :-**

तसे होउ देणार नाही. म्हणजे काय?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

तसे ते मागे झाले होते. साहेब, आज ते फॅक्ट आपल्यासमोर आलेले आहे. आपल्याकडे त्याचे करेक्शन झालेले नाही. आपण आज जे शेडयूल निश्चित केले आहे....

**जेन्वी अल्मेडा :-**

किती मुले उपस्थित आहेत?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मी तुम्हाला आणखी सजेशन देतो की, पर मन्थ तुम्ही त्याचा रिव्यु घ्या. आणि त्याचा रिव्यु श्री. बालाजी खतगांवकर साहेबांना किंवा मा. आयुक्त साहेबांना किंवा आमच्या मा. स्थायी समितीच्या सदस्यांना दिले तर बरे होईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

साहेब, पूर्ण प्रोजेक्टचा वार्षिक १० लाख रु. चा खर्च अपेक्षित आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब आपल्याला शासनसुद्धा अनुदान देते ना. ५० पैसे, १ रू. अनुदान देते ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

शासन देत नाही. आपण पूर्ण महानगरपालिकेच्या स्तरावर करत आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

खिचडीचा जो प्रकल्प आहे....

**आर.डी.असोदेकर (समाजविकास अधिकारी) :-**

ते अंगणवाडीसाठी आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, माझ्या माहितीप्रमाणे शासनाने प्रत्येक दिवसाला हजरवाईस १ रु. प्रमाणे असे जे धोरण निश्चित केले होते. मा. आयुक्त साहेब, बरोबर आहे? ती बातमी पेपरमध्ये आली होती.

**आर.डी.असोदेकर (समाजविकास अधिकारी) :-**

जिल्हा परिषदेच्या अंडरमध्ये ज्या अंगणवाडया आहेत. त्यांच्यासाठी ते होते.

**मा. आयुक्त :-**

शिक्षण अधिका-यांकडून माहिती घ्या.

**शशिकांत भोईर :-**

प्रत्येकी विदयार्थ्यांना १ रु. देणार आहेत. जरी बालवाडीचा विषय असला तरी बालवाडीच्या विद्यार्थ्यांना मिळत असेल तर तीसुद्धा मुलेच होती. म्हणजे, जास्तीत जास्त गणसंख्या कशी वाढेल, त्या आधारांवर त्यांनी म्हणजे शासनाने तसे धोरण ठरवले असे वाटते, त्याबाबत शिक्षण अधिका-यांकडून खुलासा घेउन मग आम्हांला ते सादर करा.

**मा. आयुक्त :-**

शिक्षण अधिका-यांकडून याबाबतचे परिपत्रक जर आले असेल तर त्याप्रमाणे कारवाई करावी आणि...

**रोहिदास पाटील :-**

साहेब, एक निवेदन आहे की, आपण ही जी योजना राबवतो. त्यांचे जास्तीत जास्त योजनामध्ये काय मत आहे? त्यांच्या अडचणी काय आहेत? एकंदरीत महापालिकेच्या चालणा-या शाळेबद्दल, बालवाडीबद्दल आणि प्राथमिक शाळेबद्दल लोकांना तितकेसे ॲट्रक्शन वाटत नाही. --- लोक सतत काम करतात. पालकांच्या अन्य तक्रारी, सुचना किंवा त्यांना येणा-या अडचणी, असे काहीतरी तुम्ही निवेदन करा. तुम्ही आणलेल्या एका विषयावर आम्ही मंजूरी देतो. आणि तो विषय संपून जातो. तुमचे सगळे तसेच राहते.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, सभागृहामध्ये अशी चर्चा होती की, आपण त्यांना जो आहार देतो. तो आहार एकाच प्रकारचा आहार दिला जातो. म्हणजे, प्रत्येक वेळी केळी तर केळीच दिली जातात. तर त्यामध्ये प्रशासनाकडून असे सुचविले की आपण एक आठवडयाचा पूर्ण शेडयूल तयार करु त्यामध्ये जे काही नमुद केले आहे. त्याप्रमाणे, कडधान्ये मसाल्यामध्ये तयार केलेले हा आहार एका दिवशी देण्यात येईल. शेंगदाणे, गूळ हे एका दिवशी देण्यात येईल. फूटाणे एका दिवशी देण्यात येईल. आणि अंडी द्यायची नाहीत. कारण सगळेच अंडी खातात, अशातला काही भाग नाही. म्हणून बिस्किटे आणि केळी द्यायची आणि त्यासाठी आपण संबंध शेडयूल तयार करून ठेवणार की, सोमवारी काय द्यायचे, मंगळवारी काय द्यायचे, बुधवारी काय द्यायचे असे शेडयूल तयार करुन ठेवणार आणि त्याप्रमाणे महिला व बालकल्याण समितीकडे जे सक्षम अधिकारी काम करतात त्यांचे त्यावर नियंत्रण राहिल. सन्मा सदस्यांनी जी काही तक्रार केली की, प्रत्यक्ष तो आहार मुलांना दिला जात नाही किंवा ते मिळत नाही. त्याची संपुर्ण जबाबदारी श्री. असोदेकर साहेबांची राहिल. अशा प्रकारे जर तक्रार त्यांच्याकडे आली तर त्यांना ती संपुर्ण जबाबदारी राहते.

**रोहिदास पाटील :-**

हे चर्चेच्या बाबतीत झाले. श्री. असोदेकर साहेब तुम्ही हे काम कधी पासुन करणार आहात? तुम्ही हे काम कधी पासुन करता? ह्या कामासाठी महिने झाले की वर्ष झाले?

**आर.डी.असोदेकर (समाज विकास अधिकारी ) :-**

वर्ष झाले.

**रोहिदास पाटील :-**

वर्ष भरामध्ये हे काम करतेवेळी लोकांच्या तक्रारी का आल्या? प्रॅक्टीकल काय झाले? जो पुरवठा करतो त्या पुरवठा करणा-या सुचना व तक्रारीचे काय झाले.? याबाबत तुम्ही असे काही नियोजन करता का? गेल्यावर्षीचा स्टॉक बाजुला राहिला. श्री. पाटील साहेब, अशी तुमची तक्रार होती ना. त्याचा रिझल्ट लागलाच नाही. श्री. पाटील साहेब, आलेले आम्ही बोललो. बोललो म्हणुन राहिले. ह्याची पुर्तता का होत नाही? ह्याबाबत तुम्ही जर निवेदन केले तर पाच मिनिटे जातील की अशी अशा गोष्टी करते वेळी अशा अशा तक्रारी येतात, अशा अशा सुचना येतात. आणि अशा अशा अडचणी येतात. असे तुम्ही निवेदन करा. आम्ही मंजुरी देतो. चांगल्या कामाला कोणी विरोध करायला म्हणजे, असे वाटत नाही. काही कारण सुध्दा नाही. साहेब, पण एक्झ्युकेशन हे लोक करतात. ते मौन धारण करतात. मौन धारण करत असल्यामुळे त्यांना कुठच्याही अडचणी निस्तारता येत नाही. साहेब, कुठच्या अडचणी म्हणजे येणा-या ठेकेदाराने माल बरोबर दिला का? माल आला तर त्याचे वाटप बरोबर झाले का? निदान ते पोरांनी स्विकारले का? पोर ते खातात का? तुम्ही तुमचे अधिकारी म्हणुन निवेदन करा आणि त्यांच्यात जी आवश्यक परवानगी असेल, ती सभागृहाची एकदम असे मनपंसद परवानगी द्या. आम्ही देतो. पुन्हा पुन्हा तो विषय आल्यावर तुम्ही बोलणारच नाही. मग आम्ही तुम्हाला तिरक्या नजरेने बघतो.

**जयंत पाटील :-**

साहेब, बालवाडीच्या मुलांना सकस आहाराचा जो विषय आहे तर बालवाडीच्या शिक्षकांचा जो प्रश्न आहे तो अजुन का संपत नाही? ह्या विषयावर कोण माहिती देईल? बालवाडी शिक्षकांना जो पगार वाढ झालेली आहे, त्यांच्या नेमणुकासंबधी तो प्रश्न रेंगाळत राहिलेला आहे. त्या फे-या मारतात, येतात - जातात.

**मा. आयुक्त :-**

तुमच्या सगळ्यांच्या प्रयत्नाने आम्हांला कुठेतरी कायमस्वरुपी ........

**जयंत पाटील :-**

साधारण तो प्रश्न कधी हो मिटेल ?

**मा. आयुक्त :-**

लवकरच मिटेल आठ दिवसात होईल.

**जयंत पाटील :-**

ठिक आहे म्हणजे पुढच्या मा. स्टॅंडिंगच्या अगोदर होईल का?

**मा. आयुक्त :-**

होय.

**रोहिदास पाटील :-**

श्री. असोदेकर साहेब तुम्ही सकस आहाराबाबत सांगा.

**आर.डी.असोदेकर (समाज विकास अधिकारी ) :-**

ह्याबाबत आपण जे बोललात त्याची दखल घेतली जाईल.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मी जरा कडक भाषेत बोलतो. आपण ह्यांना इतकी लिर्बटी देतो. आपण ह्यांना सगळेच द्यायचा प्रयत्न करतो पण, ह्यांची इच्छाच नसेल तर काय फायदा आहे? आपण ह्यांना प्रेमाने विचारले की, तुम्हाला वर्षभर काम करते वेळी मुलांची, पालकांची, ठेकेदारांची आणि एकदंरीत काय अडचणी आहेत ते सांगा. लोकांच्या सुचना काय आल्या ते सांगा की, हे खायला नको ते खायला द्या. ते काही बोलत नाही. तुम्हाला मंजुरी दिली? म्हणजे सगळे झाले का?

**आर.डी.असोदेकर (समाज विकास अधिकारी ) :-**

त्यामध्ये ठेकेदाराला एक अडचण आली होती. आपण जे गुळ आणि शेगंदाणे देतो. ते गुळ देतेवेळी खाली पडल्यामुळे मुंग्यांचा तेथे प्रॉब्लेम होतो. त्यामुळे त्यांनी चिक्क्यांची सोय व्यवस्थित केली आहे. चिक्की दिली तर चांगल होईल. कारण गुळाचा प्रॉब्लेम होतो. वर्गामध्ये मुंग्या होतात.

**जेन्वी अल्मेडा :-**

साहेब, माझ्या माहितीनुसार आपण जेव्हा सकस आहार वाटप करतो. समजा एका बालवाडीच्या वर्गामध्ये ३०,४० मुले असतात. रोजची उपस्थितीची अस्सीम आकडा नसतो. तरी सुध्दा आपण तो सकस आहार वाटप करतो. त्यानुसार बिल आकारला जातो. गैरहजर असेल तरी सुध्दा त्यांची हजेरी लावली जाते. आणि असे बिल काढले जाते.

**आर.डी.असोदेकर (समाज विकास अधिकारी ) :-**

ते गैरहजर असले तरी बिस्किटांची क्वांनटीटी ४ असेल तरी आपण त्याएवजी ५ वाटप करतो. जे राहिलेले असते ते त्यांचे वाटप केले जाते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही जेवता. तुम्ही चार चपात्या खाता. आणि समजा मी आलो नाही तर तुम्ही माझ्या वाटेचे जेवण जेवणार का?

**जेन्वी अल्मेडा :-**

साहेब, मी बालवाड्यांना प्रत्यक्ष भेट सुध्दा दिली. होती प्रत्यक्ष भेट देउन मी माहिती घेतली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. आर.डी.असोदेकर साहेब मा. उपायुक्त साहेब मुलांचे जे खाणे नाश्ता असतो ते थोडेसे असते. एक जण आला नाही तर तो डब्बल नाश्ता घेत नाही. तर तुमचे हे जे वाक्य आहे ते चुकीचे आहे. तर तुम्ही ह्यांनतर बिलींग जे आहे ते बिलींग तुमच्या अटेण्ड्न्र्सप्रमाणे व्हायला पाहिजे. ॲप्सेशन प्रमाणे बिलींग व्हायला नको.

(सन्मा. सदस्या श्रीम. जेन्वी अल्मेडा ह्यांनी प्रकरण क्र. ३५ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**शशिकांत भाईर :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र ३५ :-**

महानगरपालिका बालवाड्यामधील विद्यार्थ्यांना सन २००७-०८ पर्यंत सकस आहार पूरवठा करणेस मंजुरी मिळणेबाबत. (मा. महिला व बालकल्याण समिती सभा दि. १५/०५/२००७ रोजीचे शिफारस केलेले प्रकरण क्र. १८)

**ठराव क्र. ३३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण २६ बालवाड्या आहेत. सदर बालवाड्यामध्ये १७०७ मुले मुली पूर्व प्राथमिक शिक्षण घेत आहेत तसेच सदरची मुले, मुली झोपडपट्टी व आर्थिकदृष्ट्या कमकूवत वर्गातील आहेत. त्यांना सकस आहार देणे गरजेचे आहे.

बालवाड्यामधील मुलांना आठवड्यांनी सहा दिवस (रजा वगळता) मोड आलेले कडधान्य (मसाल्यामध्ये तयार केलेले) शेंगदाणे, गुळ, फुटाणे, अंडी, बिस्कीट (नाचणीयुक्त सोयाबिनयुक्त बिस्कीट) केळी, इ. प्रकारचा आहार द्यावयाचा आहे. जेणेकरुन मुलांची मानसिक व शारीरिक तंदुरुस्ती वाढेल.

महिला व बालकल्याण समिती सन २००७-०८ या वर्षासाठी ४५ लाख एवढी तरतुद आहे. सकस आहार पुरवठा करण्याची अंदाजित १० लाख एवढा खर्च अपेक्षित आहे.

तरी महिला व बालकल्याण समिती अंतर्गत सकस आहार पुरवठा करणे कामी निविदा मागविण्यास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. जेन्वी आल्मेडा** **अनुमोदक :- श्री. शशिकांत भोईर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३६ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, जे प्रकरण क्र. १९ आलेले आहे. आपण विविध प्रशिक्षण देणार आहोत. तर ते विविध प्रशिक्षण कोणकोणते आहे? ह्याची यादी भेटली तर बरे होईल. अद्यापर्यंत आमच्याकडे यादी नाही. की कोणकोणते प्रशिक्षण आपल्या महापालिकेतर्फे सुवर्ण रोजगार जंयती अंतर्गत दिली जातात. त्याबाबत ...........

**आर.डी.असोदेकर (समाज विकास अधिकारी ) :-**

विविध प्रशिक्षण म्हणजे, संगणक, ब्युटीपार्लर, लघु उद्योग, शिलाई शिवणकाम, इलेकट्रीक शिवण, वाहन चालक.

**शशिकांत भोईर :-**

एवढेच आहे?

**आर.डी.असोदेकर (समाज विकास अधिकारी ) :-**

होय.

**शशिकांत भोईर :-**

आता तुम्ही खडू बनविणे, अगरबत्ती .........

**आर.डी.असोदेकर (समाज विकास अधिकारी ) :-**

साहेब, ते सर्व टोटल लघुउद्योगामध्ये येतात.

**शशिकांत भोईर :-**

मग लघुउद्योग कोणकोणते आहेत. ते सुध्दा सांगा. त्याचे सुध्दा प्रशिक्षण देणार ना.

**आर.डी.असोदेकर (समाज विकास अधिकारी ) :-**

साहेब, लघुउद्योगामध्ये अगरबत्ती, मेणबत्ती, खडू, साबण बनविणे इत्यादी. लघुउद्योगामध्ये मोडतात.

**शशिकांत भोईर :-**

इत्यादीच्या नंतर काय आहे? म्हणजे एवढेच आहे? म्हणजे त्याच्यात झाडू वैगरे बनविणेसुध्दा आहे.

**आर.डी.असोदेकर (समाज विकास अधिकारी ) :-**

ते सुध्दा सर्व प्रकार लघुउद्योगामध्ये आहे.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही असे स्पष्टिरण करा की, कोणकोणते विविध प्रशिक्षण आहेत. आपण जसे विषय आणतो. समजा, एक श्री. आर.डी.असोदेकरांचा विषय आहे एक पाणीपुरवठ्याचा विषय आहे एक आरोग्याचा विषय आहे. असे वेगवेगळे विषय सांगा. इत्यादी हे आम्हाला सुध्दा माहित आहे. आपण सुध्दा इत्यादी लिहितो. इत्यादी मध्ये कसे आले ते सुध्दा या ठिकाणी द्या ना.

**आर.डी.असोदेकर (समाज विकास अधिकारी ) :-**

लघुउद्योगामध्ये अगरबत्ती, मेणबत्ती, खडु, साबण बनविणे तसेच झाडु ,बॅग, फ्लॉवर पॉट इत्यादी. बहुतेक लघुउद्योगामध्ये मोडतात.

**शशिकांत भोईर :-**

ह्याच्यामध्ये ते मोडतात का?

**आर.डी.असोदेकर (समाज विकास अधिकारी ) :-**

ह्याच्यामधले सुध्दा आहे.

**शशिकांत भाईर :-**

तुम्ही सभागृहाला तशी यादी सादर करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. आर.डी.असोदेकर साहेब, गेल्या आर्थिक वर्षामध्ये किती मुलांनी कम्प्युटर चे प्रशिक्षण घेतलेले आहे? किती मुलांनी वाहन चालकाचे प्रशिक्षण घेतले आहे? किती मुलांनी खड्, मेणबत्ती बनविण्याचे प्रशिक्षण घेतले आहे? किती मुलांनी लघुउद्योगाचे प्रशिक्षण घेतले आहे? तुमच्याकडे ह्याची यादी आहे का?

**आर. डी. असोदेकर (समाजविकास अधिकारी ) :-**

ते मी तुम्हाला देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही ते द्या. हा विषय पेंडिंग ठेवा. कारण आमची माहिती अशी आहे की, हा मे महिना चालू आहे. आम्ही पाठवलेल्या विद्यार्थ्यांना सांगितले की, ऑलरेडी फूल झालेले आहे. तर ह्या विद्यार्थ्यांना जर प्रशिक्षण

मिळत नाही. तर तुम्ही कुठल्या लोकांना प्रशिक्षण दिलेले आहे? दोन महिन्यामध्ये हे कसे काय फूल झाले आहे?

**आर.डी.असोदेकर (समाजविकास अधिकारी) :-**

आपण वर्षभरामध्ये मागच्या वर्षी २५ लाख रु. चे प्रशिक्षण दिले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी पैशाबद्दल विचारले नाही.

**मा. सभापती :-**

त्यांनी पैशांचे विचारले नाही. त्यांनी विचारले आहे.

**आर. डी. असोदेकर (समाजविकास अधिकारी) :-**

साडे बाराशेला करते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कुठले कुठले आहे? कम्प्युटरचे किती? वाहनचालकाचे किती? ब्युटीपार्लरचे किती? शिलाईमशीनचे किती? त्याचे डिटेल द्या.

**मा. सभापती :-**

श्री. असोदेकर साहेब, तुम्ही त्याबाबत डिटेल द्या.

**आर. डी. असोदेकर (समाजविकास अधिकारी) :-**

मी तुम्हाला त्याचे डिटेल देतो.

**शशिकांत भोईर :-**

ह्यावर चर्चा करणार ना.

**मा. सभापती :-**

आता चर्चा करणार नाही. मिटींगमध्ये सर्व सदस्य असतील तेव्हा साहेबांना घेऊन आपण चर्चा करणार आहोत.

**जयंत पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण ठेकापद्धतीने शहरातील तरुण मुले घेतो. आणि त्यांना कामाला लागल्यापासून पाच-पाच महिने पगार देत नाही. आता त्यांची मुदत संपली आहे. त्यांना घरी पाठवून दिले. आपण पुन्हा ठेका काढला. तर त्यांच्यावर का अन्याय केला जातो? आपण त्यांना ठेकापद्धतीने घेतो. तुम्ही त्याबाबत माहिती मागवा.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, ६ महिने झाले त्यांना पगार दिला नाही. ती लोक ६ महिने झाले काम करतात. महापालिका त्यांच्याकडून काम करवून घेतो. आणि त्यांना पगार देत नाही. असे कसे? आम्ही या. स्थायी समितीने कोणताही असा विषय पेंडिग ठेवला नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

२९ मार्चला प्रशासकीय मंजूरी मिळालेली आहे एप्रिलमध्ये निविदा मागविलेल्या आहेत आणि निविदेचे मुख्य लेखा परिक्षकांकडून तपासणी झालेली आहे. ती फाईल काल माझ्याकडे आलेली आहे. ह्यामध्ये कोणाचा विरोध नाही.

**रोहिदास पाटील :-**

ह्यामध्ये कोणाचा विरोध काही नाही. ते प्रामाणिक काम करतात. शासकीय कामकाजामध्ये १ तारखेच्या पगार तीन तारखेला दिला. तरी कान टवकारुन बघतात. ते म्हणतात की पगार लेट झाला. मग ५ महिने पगार न मिळणे हे कितपत योग्य आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मुख्यत्वे ती बाब आरोग्य विभागास निगडीत आहे. तो विषय वेगळा आहे. त्याबाबतीत मी आपल्याला माहिती देतो.

**रोहिदास पाटील :-**

त्यामुळे काही कारण नसताना मिसअंडरस्टॅण्डींग होते. किंवा आपण त्यांचे शोषण करतो. श्री. पाटील साहेब, त्यांचा गैरसमज होतो. मग ते काय उत्तर देत असतील?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मी येथे इंटरफेयर करतो. सन्मा सदस्य जयंत पाटील साहेब, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब यांनी या ठिकाणी मुद्दा उपस्थित केल्याप्रमाणे, ते आरोग्य विभागाशी निगडीत कर्मचाऱ्यांचे पगार मागच्या साधारणतः चार महिन्यापासून प्रलंबित आहे. ही वस्तूस्थिती आहे. त्यामध्ये आपल्याकडे ते कर्मचारी २००३ पासून ब्रेक देऊन कामावर आहेत. त्यासाठी आपण तो विषय मा. महासभेच्या मंजूरीसाठी सादर केला होता...

**जयंत पाटील :-**

साहेब, मला एक सांगा की, त्यांची मुदत फेब्रुवारीमध्ये संपलेली आहे. आरोग्य विभागाचे जे डॉक्टर्स आहेत, नर्सेस आहेत आता ते डयुटीवर आहेत का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

होय. आपण त्यांच्याकडून काम करुन घेतो.

**जयंत पाटील :-**

आपण काम करवून घेता. पगार देत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

पण त्याला जी मा. महासभेच्या मान्यता अपेक्षित होती. ती मागच्या दोन-तीन मा. महासभेमध्ये प्रत्येक वेळेस तो विषय प्रलंबित राहिला आहे.

**जयंत पाटील :-**

हा विषय मा. स्थायी समितीमध्ये आणायचा होता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आमचा तोच निर्णय होता पण मा. महापौर मॅडमनी परत तो विषय एक तारखेच्या मा. महासभेमध्ये घेतला आहे. म्हणून, स्टॅण्डींगला आला नाही.

**जयंत पाटील :-**

मा. महासभा होत नाही. कोरम पूर्ण होत नाही. सभा रद्द होतात. मा. स्थायी समितीमध्ये तो विषय आणायला पाहिजे होता. मा. महासभेशी माझे घेणे-देणे नाही. प्रश्न असा आहे की, समजा उद्या जर ती लोक कामावर आली नाहीत. तर शहरामध्ये हाहाःकार माजेल. आपण शहराच्या जनतेला जे मोफत औषध, दवापाणी देतो ते डयुटीवर आले नाहीतर किती हाहाकार माजेल आणि मला वाटते की, ह्यासाठी काल १५ ॲम्ब्युलन्स वाटप झाले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

वैधानिक अडचणीच्या दृष्टीने मा. महासभेची मान्यता अपेक्षित आहे.

**जयंत पाटील :-**

शहरातील लोकांचे आरोग्य बिघडले आहे. शहरातील डॉक्टर्स, नर्सेस ना आम्ही काही मानधन देत नाही. पाच महिने झाले आहे. त्यांनी काय कसे काम करायचे? सिमेवर लढणारा सैनिकसुद्धा पोटासाठी लढतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपल्याला त्याची कल्पना आहे की, मागच्या तीन सभेमध्ये...

**जयंत पाटील :-**

ठेकेदार आणलेल्या त्या क्लार्क असलेल्या मुलांकडून काम करवून घेतो. त्यांना पगार का देत नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

तो विषय मागच्या तीन सभेमध्ये प्रलंबित राहिलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

तो विषय पुढच्या मा. स्थायी समितीमध्ये येणार आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मग ते दोन्ही प्रश्न मिटतील.

**जयंत पाटील :-**

साहेब, ठेकेदाराचा ठेका रद्द करुन त्यांना पगार देत नाही आणि ती पुन्हा निविदा आली. पुन्हा हिच निविदा आली. २००७ ला पुन्हा हिच निविदा आली.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण तीच २००७ ला निविदा पुढे वाढवणार आहे.

**जयंत पाटील :-**

मंजूर आहे. पण त्यांना मागचे काही मानधन दिले नाही. ते तसेच उपाशी आहेत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

त्यांना मागचा नाही तर ह्याच कालावधीचा मानधन द्यायचा आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, ह्यामध्ये ठेकेदार पगार देतो. साधारणतः जेव्हा असे काही होते तर ते सांभाळण्याचे काम त्याचे आहे की नाही. तुम्ही नाही दिले तरी तांत्रिक अडचणीमुळे तुम्ही देऊ शकला तरी त्या ठेकेदाराने बोलायला पाहिजे की नाही. आता काही अडचणी असू शकतात.

**जयंत पाटील :-**

तो ठेकेदार सक्षम नसेल असा त्याचा अर्थ होईल. ठेकेदार फायनाशली सक्षम असला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

महानगरपालिकेतील आरोग्य विभागातील कर्मचारी हे ठेकेदाराकडून नसून महापालिकेत अस्थायी स्वरूपात आहे. महापालिकेची मंजूरी नसल्यामुळे ते पगार प्रलंबित आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, दोन कर्मचाऱ्यांना पगार मिळत नाही. नाना ठेकेदार आहे. त्याच्या कर्मचाऱ्यांना ही पगार मिळत नाही आणि तुम्ही आता आरोग्याचे ... तुम्ही हे महापालिकेकडून कसे...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, तुम्ही कन्फ्युज करत आहात.

**मा. आयुक्त :-**

जे पन्नास लिपिक आहेत. त्यांच्या पगाराबाबतीत चर्चा करा, त्याबाबतीत जर खुलासा करा.

**जयंत पाटील :-**

अगोदर पन्नास लिपिकांचा खुलासा करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

पन्नास लिपिकांच्या बाबतीत मा. आयुक्त साहेबांनीसुद्धा खुलासा केलेला आहे. मीसुद्धा खुलासा केलेला आहे की, त्यामध्ये आपण २९/०३/२००७ म्हणजे, मार्च महिन्याच्या शेवटी त्याला प्रशासकीय मंजूरी दिली होती. एप्रिल महिन्यामध्ये निविदा प्रोसिजर पूर्ण झालेल्या आहेत. त्या आता अंतिम झालेल्या आहेत. पुढच्या सभेमध्ये निविदा मंजूरीला तो विषय येईल. आणि बॅच इफेक्टने त्याचे पगार दिले जाईल.

**जयंत पाटील :-**

त्यांना मागच्या पाच महिन्याचा पगार मिळालेला नाही. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांच्या म्हणण्याप्रमाणे...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

ते आरोग्य विभागाचे कर्मचारी आहेत.

**जयंत पाटील :-**

मी आरोग्य विभागाबद्दल म्हणत नाही. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब (काका) तेच म्हणतात की, आपला कॉन्ट्रक्टर सक्षम नाही. हा पगार कॉन्ट्रक्टरने द्यायला पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्यामध्ये आणखी एक नवीन विषय उघडकीस आला की, आरोग्य विभागातले कर्मचाऱ्यांनासुद्धा पगार दिला नाही. दुसरा विषय सुद्धा उघडकीस आला. म्हणजे तुम्ही त्यांनासुद्धा पगार दिला नाही.

**जयंत पाटील :-**

त्यांचे म्हणणे असे आहे की, मा. महासभा झाली नाही म्हणून...

**रोहिदास पाटील :-**

समजा, श्री. खांबित साहेब ठेकेदार आहेत. तुम्ही त्याला टेक्निकली ऑर्डर काहीतरी कमी जास्त झाले असेल तसे तुम्ही द्यायला पाहिजे ना.

**दिपक खांबित :-**

ठेकेदारालासुद्धा ऑर्डर द्यायची म्हणजे ते काम करतील. म्हणजे ते पेमेन्ट करायचे ते काम करतील.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

साहेब, पुढच्या मा. स्थायी समितीमध्ये तो विषय येईल त्याच्यात काही अडचण नाही.

**रोहिदास पाटील :-**

पुढच्या ता. मा. स्थायी समितीमध्ये त्या ठेकेदाराचे, आरोग्याचे, बांधकामाचे हे सर्व येईल का?

**दिपक खांबित :-**

हा विषय मा. महासभेत घेतला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आपण मा. महासभेत आरोग्याचा विषय घेतला आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही मा. महासभेत हा विषय घेउच नका तुम्ही तो विषय मा. स्थायी समितीमध्येच घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

मी आपल्याला हे बोललो होतो. मा. महासभेत होण्यासाठी जर परिस्थीती नसेल तर आपण सहा महिन्याच्या कालावधीचा मा. स्थायी समितीमध्ये घेउन आपण अंतिम करु. मी आपणाशी पर्सनल चर्चा केली होती पण मा. महापौरांनी अजेंडा काढला आहे. त्यामध्ये परत तो विषय घेतलेला आहे. त्यामुळे डबल येथे घेण्याची गरज नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, समजा, ती मिटींग झाली नाही. कारण ......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

मिटींग झाली नाही तर आपण तो विषय मा. स्टॅण्डींगमध्ये घेउन त्या लोकांचे पगार दिले जातील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, समजा आचारसंहिता डिक्लेर झाली आणि तुम्ही मिंटीगच घेउ शकला नाही तर तुम्ही काय करणार ?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब, अजेन्डा निघालेला आहे. आपण त्याला नाही म्हणु शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी काय म्हणतो की, ..........

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

समजा, बैठक झाली नाही तर आपण मा. स्थायी समितीच्या मा. सभापती महोदयांनी , मा. आयुक्त साहेबांना विनंती करुन तो सहा महिन्याचा कालावधी मा. स्थायी समितीमध्ये घेउन आपण त्यांचे पगार देउ.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेबांना विनंती करतो की, मला सव्वा दोन वाजता मिंटीग आहे. मंत्रालयामध्ये सव्वा दोन वाजता बैठक आहे. तर त्या बैठकीला मी जात आहे. आपला हा जो विषय आहे. त्याबाबत आपल्याला चर्चा करायची हाती. शेवटचा जो विषय आहे. त्यावर आपल्याला चर्चा करायची असेल, तुम्ही चर्चा करा. परंतु, मला जाणे आवश्यक असल्यामुळे मी आता जात आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, हा विषय पहिला ठेवायला पाहिजे होता.

**मा. आयुक्त :-**

थोडक्यात असे आहे की, आपल्यासमोर हा जो विषय ठेवला आहे.........

**मा. सभापती :-**

माझे म्हणणे आहे की, सर्व सदस्यां समोर आपल्याला चर्चा करायची आहे.

**मा. आयुक्त :-**

कायद्यातील तरतुदीप्रमाणे मा. स्थायी समितीचे अधिकार आहेत. मा. स्थायी समितीने त्याबाबतीत अंतिम निर्णय घ्यायचा आहे. सर्विस रोडच्या बाबतीमध्ये अंतिम निर्णय घ्यायचा आहे. तरतुदीप्रमाणे आपण विषय ठेवलेला आहे. आपली मान्यता मिळाली की, प्रशासन त्याचे प्रोसेस सुरु करेल.

**जयंत पाटील :-**

आपला जो गोषवारा आहे त्या गोषवा-याशी आम्ही सहमत आहोत. क्लिअर आहे. ह्यामध्ये चर्चा काही वेगळी करायची आहे का?

**मा. आयुक्त :-**

समजा, आपल्याला जर चर्चा करायची असेल तर आपण चर्चा करा. किंवा मंजुरी देत असाल तर मंजुरी द्या.

**मा. सभापती :-**

ह्याबाबतीत आपण पुढच्या मिटींगमध्ये सर्व सदस्यांना बोलावुन साहेबांना बोलावुन पुर्ण चर्चा करायची आहे.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ३७ चे वाचन केले. )

**मा. सभापती :-**

हा विषय पेंडीग राहु द्या. पुढच्या मिंटीगला हा विषय येउ द्या.

**प्रकरण क्र. ३७ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१२ (१)(२) नुसार छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (काशिमिरा रोड) वरील सर्विसरोड वर असणा-या बांधकामास नोटीस देवून निष्कार्षीत करण्यास मान्यता देणेबाबत.

(सदरचा विषय मा. सभापती सो. यांच्या आदेशान्वये तहकूब करण्यात आला.)

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. असोदेकर साहेब, सभागृहाला त्याबाबत माहिती द्या सभागृहाने जी माहिती विचारलेली आहे. त्याबाबत खुलासा द्या. तुमची ही यादी आहे ना. गेल्या आर्थिक वर्षामध्ये एकुण १४३० लाभार्थीना प्रशिक्षण दिलेले आहे. आणि त्या प्रशिक्षणाची वर्गवारी खालील प्रमाणे आहे. लघुउद्योग, अगरबत्ती, फिनाईल, खराटे, खडु, झाडु, मण्याच्या वस्तु आणि खेळणी तयार करणे ५४ लाभार्थी आहेत. जी एफ.जे.एस.आय.व्हाय ची

योजना आहे. साधारणतः मला वाटते की, आपण २००० रु. वार्षिक प्रशिक्षणासाठी देतो त्यामध्ये ५० टक्के रक्कम त्याच्या प्रशिक्षण मानधना वर जाते आणि ५० टक्के साहित्यावर होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विद्यार्थी १४३० आहेत ना एका विद्यार्थीवर आपण २ हजार रु. खर्च करतो ना. श्री. असोदेकर साहेब, २८ लाख ६० हजार रु. खर्च झालेला आहे. आपले बजेट आता फक्त २० लाख रु. आहेत.

**आर. डी. असोदेकर (समाजविकास अधिकारी) :-**

ह्या वर्षात २० लाख रुपयाची तरतुद केली होती.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्यावर्षी आणि मागच्या वर्षीची किती तरतुद होती?

**आर. डी. असोदेकर (समाजविकास अधिकारी) :-**

मागच्या वर्षी २५ लाख रुपयेची तरतुद केली होती.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही इथे ३५ लाख रुपये तरतुद शिल्लक आहे. असे सांगितले आहे.

**आर. डी. असोदेकर (समाजविकास अधिकारी) :-**

साहेब, ह्या वर्षाचे ते आहे. बजेटमध्ये २५ लाख रुपये आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण, येथे २५ ते २० लाख रु. तरतुद केले आहे तर, ३५ लाख रु कुठून आले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

ऐकून घ्या. महिला व बालकल्याण समितीचे एकुण ४५ लाख रु. तरतुद आहे. ४५ लाख रु.मध्ये आता एक विषय झाला. त्याच्यावर १० लाख रु. खर्च झालेला आहे. या कामाला २० लाख रु. ह्या प्रशिक्षणावर खर्च करणार आहोत. एवढीच माहिती आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्या आर्थिक वर्षामध्ये तुमच्याकडे अजून असे किती अर्ज आलेले आहेत?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आपण अर्ज सर्व सदस्यांकडून घेतोय.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, असे असते की विद्यार्थी इथे अर्ज करतात आणि मग त्यांना सांगितले जाते की, तुम्ही नगरसेवक शिफारस पत्र आणा. ते बिचारे परत येतात. म्हणजे, तुमच्याकडे ह्या वर्षी किती अर्ज आलेले आहेत आणि गेल्या वर्षीचे किती प्रलंबित आहेत? तुमच्याकडे ह्याची माहिती आहे का?

**आर. डी. असोदेकर (समाजविकास अधिकारी ) :-**

गेल्या वर्षीचे ९० अर्ज प्रलंबित आहेत आणि ह्यावर्षी जवळजवळ १३७ अर्ज आलेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे, १३७ व ९० जर मिळाले आहेत. म्हणजे, ते पेंडिग आहेत.

**जेन्वी अल्मेडा :-**

हे जे सगळे लाभार्थी येतात ते नगरसेवकांच्या शिफारशीनुसारच येतात का?

**आर. डी. असोदेकर (समाजविकास अधिकारी ) :-**

होय.

**जेन्वी अल्मेडा :-**

सगळे नगरसेवकांच्या शिफारशीनुसारच येतात. बाहेरचे कोणी येत नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

आपण सदस्यांच्या शिफारशी घेतो कारण, आपण ज्यांना लाभार्थी म्हणुन निवडतो. त्यामध्ये आपण सदस्यांचे प्रत्येकाचे घेतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्यामध्ये जास्त लाभार्थी कम्प्युटरमध्ये येतात ना?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

होय.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग, तुम्ही असे करा की, कम्प्युटर कमी घेउ नका. लाभार्थी जास्त आले तर तुम्ही कम्प्युटर जास्त घेउ शकता ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

देतो.

**रोहिदास पाटील :-**

जास्त लाभार्थी आले तर कम्प्युटर जास्त कसे देणार? ह्यांचा सेटअप तेवढाच असेल. तुम्ही हो कसे म्हणता?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, ( काका ), गैरसमज नको महानगरपालिका ट्रेंनिंग देत नाही. ट्रेंनिंग देण्यासाठी शहरातील ज्या कम्प्युटरच्या संस्था आहेत. त्याचा उपयोग केला जातो. आणि त्या संस्थेकडे आपले लाभार्थी पाठवले जातात. हे वर्षभराचे कार्यक्रम आहे. आणि त्यासाठी आपण आपल्याकडे चार कम्प्युटर संस्था आयनडिटीफाईड केलेले आहे.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. ३६ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

सदर ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ३६ :-**

महानगरपालिका क्षेत्रातील आर्थिक दृष्ट्या गरीब व गरजू मुलामुलींना महिला व बालकल्याण समितीच्या निधीतून विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देण्याबाबत. (मा. महिला व बालकल्याण समिती सभा दि. १५/०५/२००७ रोजीचे शिफारस केलेले प्रकरण क्र. १९)

**ठराव क्र. ३४ :-**

महानगरपालिका क्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या गरजु मुला मुलींसाठी महिला व बालकल्याण समितीच्या निधीतुन लघुउद्योग अगरबत्ती, मेणबत्ती, खडू, साबण बनविणे, संगणक, वाहनचालक, शिलाई मशिन, ब्युटीपार्लर, इलेक्ट्रीशन व इतर सर्व प्रकारचे प्रशिक्षण द्यावयाचे आहे. सदर प्रशिक्षणासाठी नगरसेवक, नगरसेविकांची शिफारस पत्र येतात.

सदर प्रशिक्षणासाठी एका लाभार्थ्यांवर शासनाच्या आदेशाप्रमाणे रु. २,०००/- खर्च करावयाचा आहे. यासाठी अंदाजित रु. २० लाख इतका खर्च अपेक्षित आहे. सन २००७-०८ या आर्थिक वर्षासाठी अंदाजपत्रकामध्ये रु. ३५ लाख इतकी तरतुद शिल्लक आहे.

तरी २००७-०८ या आर्थिक वर्षात महिला व बालकल्याण समिती अंतर्गत प्रशिक्षण देण्यासाठी सुवर्ण जयंती शहरी रोजगार अंतर्गत देण्यात येणाऱ्या संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात यावे व येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदक :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो सध्या शहरामधे ...............

**जयंत पाटील :-**

त्या लिस्टचे काय झाले? १२०० जणाचे लिस्टचे काय झाले? श्री. असोदेकर साहेब, लिस्ट आणायला माणुस गेला तो कुठे गेला ? १२०० नावे वाचली का? श्री. खतगांवकर साहेब, ह्यामध्ये जो उल्लेख आहे. ....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

आपण १४३० लाभार्थीना प्रशिक्षण दिलेले आहे. ह्यामध्ये लघुउद्योग ५४ आहेत, शिवण क्लास ८१ आहेत, वाहन चालक १४० आहेत, संगणक ८५८ आहेत. आणि ब्युटीपार्लरचे २९७ आहेत.

**रोहिदास पाटील :-**

त्यांनी रिपोटिंग केले. त्याचे अधिकृत आपण त्याला मान्यता दिली डिपार्टमेंटली कोणी मान्यता दिली? त्याची तपासणी कोणी केली नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

ज्यावेळेस या ठिकाणी चर्चा झाली की काही प्रलंबित अर्ज आहेत. ....

**जयंत पाटील :-**

मला त्यांच्या नावाची आणि पत्त्यांची लिस्ट द्या. हा आपला शासकीय दर .............

**रोहिदास पाटील :-**

नाव, पत्ता, शिफारस लिस्टमध्ये असले पाहिजे. म्हणजे माझे शिफारसीचे किती आहेत हे माहित असले पाहिजे. सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेबांचे शिफारसचे किती आहेत. त्यात खोटे किती आहेत ती लगेच माहित पडली पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

१४३० लाभार्थीनी जे प्रशिक्षण घेतले आहे. अनुक्रंमाक देउन त्यांची एक यादी तयार करा आणि त्यांच्या प्रशिक्षणाचे विषय टाका आणि कोणाची शिफारस होती आणि कोणत्या वस्तीतले होते ह्याची यादी करा. आणि ती पुर्ण यादी सदस्यांना द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

लाभार्थीचे अड्रेस सुध्दा द्या आम्ही ते चेक करु.

**रोहिदास पाटील :-**

कम्प्युटर आहे की, कम्प्युटर नाही. मॅन्युअल आहे. नसेल तर आम्ही तुम्हांला देतो.

**मा. सभापती :-**

लॅपटॉप देत नाही. लॅपटॉपचे द्या ना.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, शहरामध्ये नालेसफाईच्या संदर्भात काल प्रभाग समिती क्र. ३ च्या अंतर्गत...........

**रोहिदास पाटील :-**

आता हे ऑन द रेकॉर्डिंग चालले आहे की, तुम्ही ऑफ द रेकॉर्ड चालले आहे. तसे आम्हाला सांगा दोन - चार विषय पेडिंग केले आहेत. मग, कशामधुन विषय घेणार ?

**रतन पाटील :-**

शहरामध्ये ..............

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही जे घेत आहात तोच विषय घ्यायचा आहे. पण त्यांनी मनावर घेतल पाहिजे ना. नाहीतर ते सांगतील की तुम्ही ऑफ द रेकॉर्ड चर्चा केली. म्हणुन सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, मी हे सांगतो.

**मा. सभापती :-**

तुम्ही चर्चा करा.

**रोहिदास पाटील :-**

आमचे म्हणणे आहे की, नाले - सफाईची चर्चा ऑन द रेकॉर्ड ठेवा. आपली ही हजेरी आहे. गरज आहे. म्हणजे तुम्ही एक्झ्युकेशन काय केले आधीच्या सभेमध्ये तुम्ही आम्हाला होय म्हटले ते झाले किंवा नाही असे पाच प्रश्न आम्हाला विचारायचे आहेत.

**रतन पाटील :-**

काल प्रभाग समिती ३ च्या अंतर्गत प्रभाग अधिकारी तसेच सॅनेटरी इन्स्पेक्टर यांच्या जोडीला जाउन प्रभाग समिती अंतर्गत जे काही नाले खोदाईची कामे चालु आहेत त्याची पाहणी करण्यासाठी आम्ही गेलो होतो तर असे दिसुन आले की, आम्ही महापालिकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे, नाले - खोदाई साठी परवानगी देतो इथे मशिनरी लावा, इथे नाला खोदा पण, प्रत्यक्षात जागेची पाहणी केल्यानंतर असे निष्पन्न झाले की, हे पाणी कोठुन जाणार? आपण प्रत्येक वेळी नाले - सफाई वर अधिकारी लक्ष ठेवतात ही गोष्ट वेगळी आहे पण महापालिकेच्या विकास आराखड्यामध्ये जे रस्ते आहेत त्या रस्त्याची डॅमेशन म्हणजे त्याची आखणी झाली नाही पण, इकडे पाणी तुंबले आहे. मग, ते कसे काढायचे, मग ते आडवा काय, तिथून कसे घाला, इथून तसे घालवा. अशा पद्धतीने सर्व काम चाललेले आहे. परस्पर सरळ रेषेत किंवा परस्पर रस्त्याच्या रेखांकनाप्रमाणे काम चालू नाही. इथे पाणी तुंबले आहे. त्याबाजूने खोदा, तिथून काढा तिथे तुंबले आहे तर भिंत तोडा, अशा पद्धतीने काम चालू आहे. मशिनरी अपूरी आहे. येणाऱ्या पावसाचा वेग लवकर आहे. त्यामुळे प्रत्यक्षात मला प्रशासनाला फक्त हेच सांगितले आहे की, आपण नाले खोदाईसाठी प्रत्येक वर्षी लाखो रु. खर्च करतो. तो खर्च सगळा पाण्यात आणि मातीत परत पावसाळा गेला की, परत ते लेव्हलिंगमध्ये होते. कारण, जोपर्यंत तुम्ही रस्त्याची आणि डी.पी.रोडच्या रस्त्याची रेखांकन करुन देत नाही. ते रस्त्याच्या बाजूने नाले खोदणार आहे आणि रस्त्याच्या बाजूने नाले खोदून ते पाणी आपण ज्या लेव्हलला खालीपर्यंत काढतोय. त्यापद्धतीने काढायला पाहिजे. हे आडवे-तिडवे नाले खोदतात. महापालिकेचे मशिनरी ज्या पद्धतीने वापरली. त्यापद्धतीने आपल्याला खर्च येतो. आणि सगळे पाण्यात जाते. त्या बाजूला ह्यावेळी पाणी इतके तुंबणार आहे. आता तेथे तुंबलेलेच आहे. सगळीकडे सगळे फ्लॉट टकाटक भरलेले आहेत. फक्त पाणी इकडून तिकडून वळवावळवी चालले आहे. ज्यापद्धतीने नगररचना विभाग किंवा बांधकाम विभागात त्यांचे जे काम आहे ते रस्त्याचे रेखांकन करुन प्रशासनाने त्यावर त्वरीत लक्ष म्हणजे प्रत्यक्षात पाहणी करा. मी मा. सभापती साहेबांना सांगेन, की मा. स्थायी समितीची सभा थांबून त्याची पाहणी त्वरीत करावी. म्हणजे, सगळेच पाहणी करा मी फक्त प्रभाग समिती ३ मध्ये गेलो होतो.

**मा. सभापती :-**

पाहणी करायला कधी जायचे आहे?

**रतन पाटील :-**

आपण समिती ठरवा....

**मा. सभापती :-**

मी आपल्याला विचारत आहे की, कधी जायचे आहे? आता जायचे आहे. नंतर जायचे आहे. १ तासात जायचे आहे. कधी जायचे आहे?

**जयंत पाटील :-**

आपल्याला वेळ कधी आहे?

**रतन पाटील :-**

आपल्याला आतासुद्धा जायला वेळ आहे. पण आरोग्य अधिकारी असते तर आपण तेथे गेलो असतो.

**मा. सभापती :-**

येथे आरोग्याचे कोण आहेत? कोणी नाही.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, यांच्या विषयालाच धरुन मी बोलतोय, आपला सिग्नल कडून म्हणजे, ॲम्ब्यूलन्स वाटपाचे तेथे जो कार्यक्रम चालू होता. तिथून तो गटार रस्ता नवघर गावापर्यंत येतो. तर त्या गटारावर मागे इमारतीचे इकोशमेंट आपल्या गटारात होते. मी म्हणतो की, अगोदर त्या इमारतीचे डिर्माकेशन करा.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, ते केले आहे. त्याची प्रिंट माझ्याकडे आहे.

**जयंत पाटील :-**

आणखी एक म्हणजे, गोडदेव स्मशानाच्या बाहेर तेही आता प्रिंट गटारामध्ये मोडते. तेथे चालले आहे.

**मा. सभापती :-**

आपण तेथे पाहणी करुन घेऊ या.

**जयंत पाटील :-**

गटाराचे डिर्माकेशन होऊ द्या.

**तूळशीदास म्हात्रे :-**

आता गटाराचे जे काम चालले आहे. मागच्या २ वर्षापूर्वी तेथे सळ्या टाकले आहे. त्या सडलेल्या आहे. तेथे नवीन सळ्या टाकायला हवे होते.

**जयंत पाटील :-**

गोडदेव स्मशानाकडून जो रस्ता आला. आणि तो कॉर्नरला टच होतो. विकासकाचे काम चालू होणार आहे. फक्त त्याने आता कंपाऊन्ड घातले आहे. ते गटाराच्या जागी येते. सन्मा. सदस्य तूळशीदास म्हात्रे साहेब हे तुमच्या लक्षात आहे का?

**तूळशीदास म्हात्रे :-**

माहित आहे.

**जयंत पाटील :-**

ते स्मशानाला लागून बाहेर आहे.

**रतन पाटील :-**

मशिनरी अपूरी आहे. हे काम कधी होणार? आता पावसाळा जवळ आला आहे.

**तूळशीदास म्हात्रे :-**

एकूण जे.सी.पी किती लावले आहेत? त्याचा आकडा द्या. आपण जाऊन बोलू.

**रतन पाटील :-**

अधिकारी नाही. मी तेच बोलत आहे. प्रत्यक्षामध्ये दोन ते तीन मशिनरी चालू आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, मागे मा. स्थायी समितीमध्ये चर्चा झाली, त्याप्रमाणे गोल्डन नेस्टच्या रोडला एक बिल्डिंग नाल्यावर बनवली होती. आणि त्याच्यावर खूप चर्चा झाली. ईमिजिएटली मा. आयुक्त साहेबांनी श्री. अजित पाटील साहेबांना सांगितले आणि ताबडतोब ती बिल्डिंग तोडली. आता तेथे जाऊन पुन्हा बघितले तर तेथे बिल्डिंग पुन्हा उभी राहिली.

**रतन पाटील :-**

साहेब, त्या दिवशी मा. आयुक्त साहेबांनी माणसे पाठवून ती बिल्डिंग तोडण्यात आली होती. वरुन मोठे मोठे स्लॅप तोडून भोके पाडली. ती पूर्ण बुजवली गेलेली आहेत. परत इमारतीचे बांधकाम झालेले आहे. कारण मी पाहणीमध्ये तेसुद्धा पाहिले. तर ते कसे झालं?

**रोहिदास पाटील :-**

साहेब, ह्याचा अर्थ महानगरपालिकेत मा. आयुक्तासहित कोणीही सक्षम नाही का? तुम्हीच मान्य करता म्हणून ते तोडता. तुम्हीच मान्य करता म्हणून ते बनते. म्हणजे, नियमाचे उल्लंघन कोण करते? बनवणारा, करतोय की, ह्या सभागृहामध्ये बोलणारा करतोय? डी. पी. रोडवरुन प्रोटेक्ट करू शकत नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, त्याबद्दल मला आणखी एक बोलायचे आहे की, हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे का? न्यायप्रविष्ठ आहे की न्यायप्रविष्ठ झालेले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

मा. आयुक्त साहेबांनी आरोग्याचा विषय माझ्याकडे दिलेला आहे. अतिक्रमणाचा विषय मा. उपायुक्त पानपट्टे साहेबांना दिलेले आहे. आम्ही दोघांनीही ही बाब प्राधान्याने तपासू आम्ही ते पर्सनली पाहून घेतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्याचा अर्थ तुम्हांला आमच्यावर विश्वास नाही. मा. स्थायी समितीच्या सदस्यावर तुम्हाला विश्वासच नाही. हे सदस्य तुम्हाला खोटी माहिती देतात. असे तुम्हाला वाटते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

साहेब, तुम्ही असे कसे बोलता?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही असे डिसीजन घेतला पाहिजे की, जर ती बिल्डींग तुटलेली असेल आणि आता उभी राहिली असेल तर त्या बिल्डींगला ताबडतोब डिर्माकेशन द्या असे तुम्ही त्या तपासुन बघा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

तपासुन बघतो म्हणजे ते पेंडीग ठेवण्यासाठी नाही. ती कारवाई करण्यासाठी म्हणतो.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मग, तुम्ही उद्या सांगाल की, त्यावर स्टे घेतला नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, प्रोसिडींगमध्ये अशी नोंद घ्या की, साहेबांनी असे रुलिंग दिले आहे की, जर ते तुटलेले पुनॉवग्रेशन ताबडतोब जोडुन देउ.

**तुळशीदास म्हात्रे :-**

उद्या पाहणी केल्यानंतर त्यांनी स्टे घेतला तर मग काय करणार?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

साहेब, स्टे व्हॅकेट करु ना. जर आरोग्याच्या दृष्टीने आणि रस्त्यात येत असतील नाल्याच्या प्रवाहात येत असतील तर ही बाब मान्यवर कोर्टाच्या निदर्शनास आणुन तो स्टे व्हॅकेट करुन ती तोडली जाईल.

**मा.सभापती :-**

मा. स्थायी समिति ची सभा ही खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली . आजची मा. स्थायी समितीची सभा संपली असे जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.३०**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**